## नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०२२ मधील
## नि.५५ वरील आदेश

(आदेश पारित दिनांक १२/०७/२०२३)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १३(अ) म्हणून श्री.प्रसाद हरिश्चंद्र बाईत असे नांव नमुद आहे. सदर प्रतिवादी क्र. १३(अ) यांचे नांव 'प्रसाद' नसून 'प्रशांत' आहे. सदरची दुरुस्ती ही साधारण असून तशी दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी केलेली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०१ यांनी आपले म्हणणे दाखल करुन हरकत नसलेचे नमुद केले आहे.

०३. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी क्र. ५ यांनी आपले म्हणणे दाखल करून अर्जास हरकत नोंदविली आहे.

०४. अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने धडेवाटप होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची दिसून येते. सदरचा दावा हा प्राथमिक टप्प्यावर आहे. त्यामुळे दुरुस्ती केल्यास कोणत्याही स्वरुपाचे नुकसान प्रतिवादींना होणार नाही. याउलट दाव्यातील दुरुस्ती मंजूर केलेस उभय पक्षकारांमधील वादाचा अंतिमरित्या गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे आणि त्यामुळे दाव्याचे स्वरूप बदलत नाही असे माझे मत आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

मदन कृष्णा गावडे वि.
बाबली गणेश गावडे वगैरे

नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०२२
(नि.५५ वरील आदेश )

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. वादीचा निशाणी क्र.५५ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी.

३. सदरचा खर्च वादीने सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

सही/–
(श्रीमती आर. जी. कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
सावंतवाडी.

दिनांक– ०७/१२/२०२३
ठिकाण– सावंतवाडी

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | U. B. Hundekar (Grade-3) |
| Court | :- | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Sawantwadi |
| Date | :- | 07/12/2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 07/12/2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 08/12/2023 |